Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, म.स.८३२ ए, प्लॉट नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आगरकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या पाठी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020) 25651751 Secretary(P) : 25651750 EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.म.शि./परीक्षा-२/२५६४

पुणे-४११००४

दिनांक-१३/०६/२०२५

परीक्षा प्राधान्य/महत्त्वाचे

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे.

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा जून-जुलै २०२५ चे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत...
संदर्भ- या कार्यालयाचे पत्र क्र.म.शि./परीक्षा-२/१२० दि.०९/०१/२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा जून-जुलै २०२५ परीक्षेसाठी गणकयंत्र विभागामार्फत सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना online पध्दतीने प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा मूल्यमापनाचे गुण login मधून भरण्याची सुविधा देण्यात येणार आहे.

जून-जुलै २०२५ मधील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षेचे गुण मंडळाचे संकेतस्थळ www.mahahsscboard.in यावर माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या login मधून फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेप्रमाणे Checker/Maker याचा अवलंब करून ऑनलाईन पध्दतीने दिनांक २४/०६/२०२५ ते दिनांक ०४/०७/२०२५ या कालावधीमध्ये नोंदवून ऑनलाईन पध्दतीने मंडळाकडे जमा करावयाचे आहेत. तसेच मंगळवार दिनांक ०८/०७/२०२५ रोजी प्राचार्य/मुख्याध्यापक यांचा शिक्का व स्वाक्षरीसह गुणतक्ते विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून विभागीय मंडळात जमा करावयाचे आहेत. जून-जुलै २०२५ परीक्षेकरीता Out of Turn साठी संधी उपलब्ध राहणार नाही.

सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व संदर्भीय पत्रासोबतच्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्याबाबत विभागीय मंडळ स्तरावरून सूचित करावे.

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

क्र.मुंविमं/उमाप/
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक-२८/०६/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
मुंबई / बृहन्मुंबई / ठाणे / पालघर / रायगड जिल्हे.

या कार्यालयाचे दि.२६.०६.२०२५ च्या पत्रान्वये प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाचे गुण/श्रेणीतक्ते मंडळात जमा करण्याच्या तारखा दि. १४.०७.२०२५ व दि. १५.०७.२०२५ रद्द करण्यात आली असून उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक/प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन सुधारित तारीख दिनांक ०८.०७.२०२५ रोजी सदर साहित्य मंडळात जमा होईल याची खबरदारी घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे- पवार)
प्र.विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई- ४०० ७०३

Scanned with OKEN Scanner